**अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराच्या निविदा प्राप्त झाल्यास त्यांच्या स्विकृती संदर्भात अनुसरण्याच्या सुधारीत मार्गदर्शक सूचना ..**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
शासन निर्णय क्र.बीडीजी २०१६/प्र.क्र. २/इमा.२
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक - १२ /२/२०१६

**प्रस्तावना :-**

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रस्ते, पुल व इमारतींची बांधकामे तसेच दुरुस्तीची कामे हाती घेऊन पुर्ण करण्यात येतात. सदर कामे कंत्राटदारांना विहीत कार्यपध्दतीचे पालन करुन खुल्या स्पर्धात्मक निविदा बोलावून प्राप्त होणा-या निविदामध्ये निम्नतम निविदाकारास काम प्रदान करण्यात येऊन त्यांच्यामार्फत पूर्ण करुन घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येते. या सर्व प्रक्रिये संदर्भात शासनाने वेळोवेळी विविध शासन निर्णय/परिपत्रके/पत्रान्वये मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागाने रु. ३ लक्ष रक्कमे पेक्षा मोठया कामांच्या निविदा ई-टेंडरींग द्वारे बोलाविण्याबाबत निर्णय घेतला असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. या पध्दतीमुळे कामांची निविदा प्रक्रिया अधिक पारदर्शक झाली असून या प्रक्रियेमध्ये कोणत्याही बाबीचा हस्तक्षेप होत नसल्याने खुली स्पर्धा होवून निविदा प्राप्त होत आहेत. ब-याच कामांच्या निविदा अंदाजपत्रके दरापेक्षा खुप कमी दराच्या प्राप्त होण्याचे प्रमाण नजीकच्या काळात मोठया प्रमाणात वाढले असल्याचे निदर्शनास आणण्यात आले आहे. या संदर्भातील अनुभव विचारात घेता ब-याच निविदा अंदाजपत्रके दरापेक्षा १० टक्क्याहुन अधिक कमी दरांच्या प्राप्त होत असल्याचे दिसून येते. कंत्राटदारांनी भरलेले दर काम करण्यासाठी योग्य नसल्याने कमी दरांच्या निविदा भरणारे कंत्राटदाराकडून निविदा प्रकिया पूर्ण न करणे, कामे अर्धवट स्थितीत सोडून देणे इत्यादी बाबी उद्भवत असल्याचे दिसून आले आहे.

यामुळे ठरविलेल्या कार्यक्रमाप्रमाणे कामे पूर्ण करणे शक्य होत नाही. कंत्राटदारांविरुध्द स्विकृत निविदेतील तरतुदीप्रमाणे काम विहित नियोजनाप्रमाणे न केल्यास कार्यवाही करावयाची झाल्यास बराच कालावधी लागतो. या संदर्भाने कंत्राटदार न्यायालयातही जावून कामांच्या प्रगतीवर तसेच गुणवत्तेवर विपरीत परिणाम होतो. पर्यायाने निधी व्यपगत होणे, कामे न झाल्यामुळे कामे ज्याच्यासाठी करण्यात येत आहेत त्यांना आवश्यक सुविधा प्राप्त न होणे इत्यादी बाबी उद्भवतात.

या सर्व बाबींवर उपाय योजना करण्याच्या दृष्टीकोनातून कमी दराच्या निविदा स्वीकृत करतांना अवलंबिण्यात येणा-या कार्यपध्दतीमध्ये काही बदल करणे आवश्यक असल्याचे शासनाच्या निर्दशनास आले आहे. या सदंर्भात दिनांक १६/१२/२०१५ रोजी महाराष्ट्र विधी मंडळाच्या सत्रा मध्ये झालेल्या चर्चेदरम्यान विविध विधानसभा सदस्यांनी कमी दराच्या निविदा प्राप्त होवून कंत्राटदार कामे कार्यक्रमानुसार करत नसल्याने त्यांच्या मतदार संघामध्ये विकास कामे विहित कालमर्यादेत व गुणवत्तेनुसार पूर्ण होत नसल्याबाबत व त्यामुळे जनतेस अडचणीच्या परिस्थितीस समोरे जावे लागत असल्याची बाब सभागृहाचे निर्दशनास आणली आहे. या संदर्भात मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी केलेल्या निवेदनात कमी दराच्या स्वीकृतीसंदर्भात नविन मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत असून या सूचनांप्रमाणे कार्यवाही सुरु झाल्यावर अशा बाबी उद्भवण्यास प्रतिबंध येईल असे नमूद केले आहे.

या संदर्भात नविन मार्गदर्शक सूचना निर्गमीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या संबंधाने सविस्तर अभ्यास करुन शासन आता खालीलप्रमाणे नवीन सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित करीत आहे :-

**शासन निर्णय -**

१. निविदा प्रक्रिये मध्ये प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा दहा टक्क्यापेक्षा अधिक दराने कमी असेल तर संबंधित कंत्राटदाराकडून एवढया कमी दरात काम करण्याचे नियोजनाबाबत सविस्तर तपशील निविदा बोलाविणा-या अधिका-याने प्राप्त करुन घ्यावा. कंत्राटदारांनी दिलेल्या तपशीलाच्या आधारे सदर काम निम्नतम देकाराच्या किंमतीत पूर्ण करता येणे शक्य असल्याची खात्री करुन घेण्यात यावी.

२. प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १०% पर्यंत कमी दरांचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन किमतीच्या १% एवढया रकमेचा धनाकर्ष (Demand Draft) परफॉर्मन्स सिक्युरीटी म्हणून निविदेच्या लिफाफा क्र.२ मध्ये सादर करावा. (Scan करुन ई-निविदेसोबत सादर करावा.) (उदा :- १ % ते १०% कमी दर - १ % रक्कम)

३. प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार १०% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे तेवढया रकमेचा व वरील बाब-२ प्रमाणे येणा-या रकमेसह एकत्रित धनाकर्ष (Demand Draft) निविदेसोबत लिफाफा क्र. २ मध्ये सादर करावा. (उदा :- १४ % कमी दर - १० % पर्यंत करिता- १ टक्का व (१४% -१०% ) - ४ %असे एकूण ५ %)

४. धनाकर्ष उपलब्ध करुन देणे/धनाकर्ष परत करणे व इतर बाबींबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

(अ) धनाकर्ष निविदा बोलाविणा-या कार्यकारी अभियंता यांच्या नावे असावा.

(ब) धनाकर्ष सरकारी बँका किंवा शेडयुल्ड बँकांकडून काढलेला असावा.

(क) धनाकर्षाची मुदत निविदा भरण्याच्या दिनांकानंतर किमान ३ महिनेपर्यंत असावी.

(ड) धनाकर्षाची प्रत Scan करुन ई-निविदा भरताना ठेकेदारांनी अपलोड करावी.

(इ) धनाकर्ष सिलबंद लिफाफ्यामधून कंत्राटदारांनी निविदा स्विकृतीच्या दिनांकापासून ५ (५) working days कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात जमा करावा. लिफाफ्यावर कामाचे नाव व निविदासूचना क्रमांक लिहिण्यात यावा.

(फ) धनाकर्षावर बँकेचा MICR व IFSC कोड नंबर असणे आवश्यक आहे.

(ग) निविदा उघडल्यावर लिफाफा क्र.१ मधील कागदपत्रांची पूर्तता न झाल्यास संबंधित कंत्राटदारांना त्यांच्या धनाकर्षाचे लिफाफे कार्यकारी अभियंता यांनी निविदा उघडल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांत परत करावेत.

(घ) लिफाफा क्र.१ मधील कागदपत्रांची पूर्तता घेऊन ज्या कंत्राटदारांचे लिफाफा क्र.२ मधील देकार उघडण्यात येतील त्यामधील निम्नतम २ निविदाकारांचे धनाकर्ष लिफाफे वगळता इतर कंत्राटदारांचे धनाकर्ष लिफाफे ७ दिवसांत परत करण्यात यावेत.

(च) निम्नतम निविदाकारांना कार्यारंभ आदेश दिल्यानंतर ३ दिवसांत क्र.२ चे निम्नतम निविदाकाराचा धनाकर्ष परत करण्यात यावा.

(छ ) वरील पध्दतीमध्ये खोटी कागदपत्रे/धनाकर्ष सादर करणा-या कंत्राटदारांची अनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात यावे व संबंधित ठेकेदारांची नोंदणी १ वर्षासाठी स्थगित ठेवण्यात यावी. यासाठी अधीक्षक अभियंता यांना पूर्ण अधिकार राहतील.

५. कार्यकारी अभियंता यांनी निम्नतम निविदाकारांकडून प्राप्त धनाकर्ष वटविल्यानंतरच कार्यारंभ आदेश देण्याची कार्यवाही करावी.

६. काम समाधानकारकपणे पूर्ण झाल्यावर निविदेतील तरतूदींप्रमाणे ठेकेदारांकडून प्राप्त परफॉर्मन्स सिक्युरिटीची रक्कम ३ महिन्याच्या आत कंत्राटदारांना कार्यकारी अभियंता यांनी परत करावी.

७. उपरोक्त बाबीं संदर्भात शासनाने यापूर्वी निर्गमीत केलेल्या सर्व मार्गदर्शक सूचना अधिक्रमीत करण्यात येत आहेत.

८. हा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर प्राप्त होणा-या सर्व कमी दराच्या निविदांसाठी लागू राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२१२१२५६५०१११८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Vidyadhar Dinkar Sardeshmukh

Digitally signed by Vidyadhar Dinkar Sardeshmukh
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Vidyadhar Dinkar Sardeshmukh
Date: 2016.02.12 13:01:08 +05'30'

**( वि.दि.सरदेशमुख )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) सचिव (रस्ते)/सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे स्वीय सहायक.
२) सर्व मुख्य अभियंते, सा.बां.विभाग.
३) मुख्य अभियंता (विद्युत), सा.बां.विभाग, मुंबई.
४) सर्व अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ.
५) अधीक्षक अभियंता (विद्युत), विद्युत (सा.बां.) मंडळ, मुंबई.
६) सर्व कार्यकारी अभियंते, सा.बां.विभाग.
७) सर्व कार्यासन अधिकारी, सा.बां.विभाग, मंत्रालय.
८) कार्यासन अधिकारी इमा.२ (निवडनस्ती).